३	विनिमय पध्दतीने मिळणारे	-	-	०००
४	सभासदत्वानुसार मिळणारे	-	-	०११
५	इतर			०००
	एकूण	-	-	**४६३**

	ग्रंथालयातील सभासद संख्या	
१	पदव्युतर विद्यार्थी	१८१०
२	संशोधक विद्यार्थी	१४६
३	एम.फील. विद्यार्थी	१६६
४	विद्यापीठातील प्राध्यापक	१९३
५	महाविद्यालयीन प्राध्यापक	८०
६	विद्यापीठातील शिक्षकेत्तर कर्मचारी	३०१
७	विद्यापीठातील सिनेट व व्यवस्थापन परिषद सदस्य	११
८	सहयोगी सभासद	२२
९	सहायक शिक्षक	-
	एकूण	२,७२९

झेरॉक्स सेवा :

संशोधक, विद्यार्थी व कर्मचारी यांच्या मागणीनुसार ग्रंथ तसेच नियतकालिकांतील मजकुरांच्या १,२३,५०८ छायाप्रती काढून देण्यात आल्या.

५. ग्रंथांची देवघेव :

वृतांत वर्षात वाचकांना घरी व इतर विभागांत वाचकास दिलेल्या ग्रंथांची व नियतकालिकांची संख्या अंदाजे २१,९०० इतकी झाली आहे. तसेच त्यांच्यासाठी अंतर ग्रंथालय देवघेव योजना नेहमीप्रमाणे राबविण्यात आली आहे.

६. संदर्भ व प्रलेखन विभाग :

नेहमीप्रमाणे या विभागातून सर्व प्रकारच्या वाचकांना त्यांच्या गरजेनुसार संदर्भ सेवा व मार्गदर्शन दिले गेले. ग्रंथालयाच्या नवीन नियमानुसार अंशकालीन वाचकांना शुल्क आकारण्यात येत असून त्यानुसार वृतांत वर्षामध्ये एकूण ६१९ वाचकांना सेवा पुरवण्यात आली आणि रु. १४९९० शुल्क विद्यापीठात जमा करण्यात आले.

तसेच या विभागातर्फे नवीन दाखल झालेल्या विद्यार्थ्यांना व इतर अभ्यागतांना ग्रंथालयाची ओळख व ग्रंथालयीन नित्य व्यवहारांची माहिती देण्यात आली.

७. बांधणी विभाग :

अ.क्र.	विवरण	एकूण
१	बांधणी झालेली नियतकालिके	१३०३
२	बांधणी झालेले ग्रंथ	२७३४
३	कायद्याची नियतकालिके	१६७
	एकूण	**४२०४**

८. **इतर महत्त्वाच्या नोंदी :-**

अ. पदोन्नती :

१. **श्री. एल. व्ही. कांबडी** वरिष्ठ ग्रंथालय सहायक या पदावर दि. १३.५.२००८ रोजी नियुक्ती

२. **श्री. एल. आर. साबळे** वरिष्ठ ग्रंथालय सहायक या पदावर दि. १३.५.२००८ रोजी नियुक्ती

३. **सौ. कुलकर्णी जी. वाय.** वरिष्ठ ग्रंथालय सहायक या पदावर दि. १३.५.२००८ रोजी नियुक्ती

४. **श्री. ठाले आर. आर.** वरिष्ठ सहायक ग्रंथपाल या पदावर दि. ३.७.२००८ रोजी पदोन्नती आणि विद्यापीठाच्या सेवायोजन आणि मार्गदर्शन केंद्र येथे प्रतिनियुक्ती

ब. नवीन भरती :

१. **डॉ. वीर डी. के.** उपग्रंथपाल या पदावर दि. १३.६.२००८ रोजी रुजू

२. **श्री. एस. एल. पद्मे** सहायक ग्रंथपाल या पदावर दि. २२.५.२००८ रोजी रुजू

३. **कु. भोये के. के.** सहायक ग्रंथपाल या पदावर दि. २०.५.२००८ रोजी रूजू

क : उपक्रम :

१. सुवर्ण महोत्सवी वर्षी ग्रंथालयातील दुर्मिळ ग्रंथांचे प्रदर्शन दि. २३ ऑगस्ट २००८ ते ३१ ऑगस्ट २००८ पर्यंत आयोजित करण्यात आले होते. याचे उदघाटन श्री. के. एल. बिष्णोई, पोलीस आयुक्त यांच्या शुभहस्ते झाले. अध्यक्षस्थानी डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, ओरंगाबाद हे होते.

२. महाराष्ट्र शासनाकडून विद्यापीठ सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त ग्रंथालयास इंटरनेट प्रयोगशाळा विकसित करण्यासाठी रु. ५० लाखांचा निधी मंजूर झाला असून प्रयोगशाळा विकसनाचे काम प्रगतीपथावर आहे.

३. ग्रंथालयातील वाचनसाहित्याची सुरक्षितता करण्यासाठी अर्थात ग्रंथांची चोरी व ग्रंथ गहाळ होऊ नये. म्हणून विद्यापीठ निधीतून रु. ३० लाखांचा निधी मंजूर झाला आहे. Security Sytem चे काम प्रगतिपथावर आहे.

वैयक्तिक माहिती :

१. **डॉ. डी. के. वीर - उपग्रंथपाल.**
Extra Curricular Activities -04
Subject Expert -04
Papers Published -06
Research Projects Guided – 13 M.Phil., 4 M.Lib.

२. **डॉ. शाहिस्ता परवीन -सहायक ग्रंथपाल**
चर्चासत्र /परिसंवाद / कार्यशाळा यांच्यात सहभाग- ०६

शारीरिक शिक्षण विभाग

अध्यापकांची संख्या:- ०३

विभागातील उल्लेखनीय कार्यक्रम :-

१) **अश्वमेध आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धा**

१ जुलै २००७ ते ३० जून २००८ या वर्षी खालील प्रमाणे अश्वमेध आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धा विद्यापीठ प्रांगण व संलग्नित महाविद्यालयांत घेण्यात आल्या.

अ.क्र.	खेळाचे नाव	महाविद्यालयाचे नाव	दिनांक
१.	क्रॉस कंट्री रेसेस मुले व मुली	कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, बदनापूर.	५/९/२००७
२.	जलतरण मुले व मुली	शारीरिक शिक्षण विभाग, डॉ.बा.आं.म..विद्यापीठ.	१३/०८/२००७
३.	जुडो मुले व मुली	देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद.	३१/०८/२००७
४.	वेट लिफ्टींग ॲण्ड बेस्ट फिजिक्स मुले	बलभीम कॉलेज, बीड	२१-२२/०८/२००७
५.	बॉक्सींग मुले	डॉ.बा.आं.म..विद्यापीठ, औरंगाबाद	१०-११/०९/२००७
६.	जिम्नॅस्टिक मुले व मुली	स.भु. विज्ञान महा. औरंगाबाद.	११/०९/२००७
७.	चेस मुले व मुली	एम:आय.टी. कॉलेज, औरंगाबाद.	१८ व २०/१०/२००७
८.	सॉफ्टबॉल मुले	बलभीम महाविद्यालय, बीड.	२७-२९/१२/२००७
९.	टेबल टेनिस मुले	डॉ.बा.आं.म..विद्यापीठ, औरंगाबाद	९ व १०/१०/२००७
१०.	हॉकी मुले	औरंगाबाद कॉलेज फॉर वुमेन,औरंगाबाद	२८ ते २९/०९/२००७
११.	बॅडमिंटन मुले	डॉ.बा.आं.म..विद्यापीठ, औरंगाबाद.	२५ ते २६/०८/२००७
१२.	बॅडमिंटन मुली	डॉ.बा.आं.म..विद्यापीठ, औरंगाबाद.	२५ ते २६/०८/२००७
१३.	फुटबॉल	जे.इ.एस. कॉलेज, जालना	२४ ते २६/०९/२००७
१४.	हॉकी मुले	डॉ.बा.आं.म..विद्यापीठ, औरंगाबाद.	२ ते ४/०१/२००८
१५.	बॉल बॅडमिंटन मुले	मौलाना आझाद महाविद्यालय, औरंगाबाद.	१६ ते १८/०८/२००७
१६.	कुस्ती मुले	भगवान महाविद्यालय, औरंगाबाद	६ ते ८/०९/२००७
१७.	हँडबॉल मुले	कला, विज्ञान, वाणिज्य महाविद्यालय, धानोरा.	२७ ते २९/८/२००७
१८.	टेनिस मुले	डॉ.बा.आं.म..विद्यापीठ, औरंगाबाद.	८ ते १०/०८/२००७
१९.	बॉस्केटबॉल मुले	डॉ.बा.आं.म..विद्यापीठ, औरंगाबाद.	१ ते ४/०९/२००७
२०.	बॉस्केटबॉल मुली	डॉ.बा.आं.म..विद्यापीठ, औरंगाबाद.	१ ते ४/०९/२००७
२१.	खो-खो मुले	एम.आय.टी.कॉलेज, औरंगाबाद.	५ ते ७/१०/२००७

२२.	खो-खो मुली	एम.आय.टी.कॉलेज, औरंगाबाद.	५ ते ७/१०/२००७
२३.	कबड्डी मुले	बी.झोन-आनंदराव धोंडे महाविद्यालय, कडा.	१७ ते १९/०९/२००७ १८ ते २०/९/२००७
२४.	व्हॉलिबॉल मुले	ए.झोन-प्रतिष्ठान महा. पैठण	१८ ते २०/०९/२००७
२५.	कबड्डी मुली	श्रीकृष्ण महाविद्यालय, गुंजोटी	१५ ते १६/१०/२००७
२६.	व्हॉलीबॉल मुली	श्रीकृष्ण महाविद्यालय, गुंजोटी	१५ ते १६/१०/२००७
२७.	आर्चरी मुले व मुली	बंकट स्वामी महाविद्यालय, बीड.	१४ ते १५/८/२००७
२८.	क्रिकेट मुली	वेणुताई चव्हाण महिला महा.अंबाजोगाई.	३ ते ४/१०/२००७
२९.	पिस्तोल ॲण्ड रायफल शूटिंग मुले व मुली	बारवाले कॉलेज, जालना	१२/१०/२००७
३०.	क्रिकेट मुले (जिल्हानिहाय)		
	औरंगाबाद	सलेक्शन ट्रायल, औरंगाबाद.	
	जालना	जे.इ.एस. महा. जालना.	
	बीड	सलेक्शन ट्रोंयल	
	उस्मानाबाद	एम.डी. पाटील. महा. मुरुम	१५ ते २०/१०/२००७ २२ ते २३/१०/२००७ इंटर झोन.
३१.	मैदानी स्पर्धा मुले व मुली	पी.ई.एस. शारीरिक शिक्षण महाविद्यालय, औरंगाबाद.	१२ ते १४/०९/२००७

२) खालील खेळांमध्ये सराव शिबिरे आयोजित करुन विद्यापीठाचे संघ आंतरविद्यापीठ स्पर्धेकरीता पाठविण्यात आले.

१. क्रॉस कंट्री रेस- मुले व मुली - कालीकत
२. स्वीमिंग - मुले व मुली- कानपूर
३. जुडो- मुले व मुली - चंदीगड
४. वेट लिफ्टिंग ॲण्ड बेस्ट फिजिक्स-मुले- पतीयाळा
५. बॉक्सींग मुले - --
६. जिम्नॅस्टिक्स - मुले व मुली - पतीयाळा
७. चेस - मुले व मुली - कानपूर
८. सॉफ्टबॉल - मुले - अमृतसर
९. टेबल टेनिस- मुले - सुरत
१०. टेबल टेनिस- मुली - सुरत
११. बॅडमिंटन- मुले - आनंद-गुजराल
१२. बॅडमिंटन- मुली - आनंद-गुजराल
१३. फुटबॉल - गोवा
१४. हॉकी- मुले - जयपूर
१५. बॉल बॅडमिंटन-मुले - मँगलसो
१६. रेसलिंग- मुले - कोल्हापूर
१७. हँडबॉल - मुले - गुंजूर
१८. टेनिस -मुले - उदयपूर
१९. बास्केटबॉल- मुले - जळगाव
२०. बास्केटबॉल- मुली - तिरुपती
२१. खो-खो- मुले - आणंद-गुजराल
२२. खो-खो- मुली- तिरुयुनवेली
२३. कबड्डी -मुले - कोटा
२४. व्हॉलीबॉल - मुले- डॉ.बा.आं.म.विद्यापीठ, औरंगाबाद.
२५. कबड्डी-मुली - मदुराई
२६. व्हॉलिबॉल- मुली - विजयवाडा

२७. आर्चरी - मुले व मुली- चंदीगड २८. क्रिकेट - मुली- वनास्थली
२९. पिस्तोल ॲण्ड रायफल शुटिंग- मुले व मुली - कुरुकक्षेत्र ३०. क्रिकेट - मुले- उदयपूर
३१. मैदानी स्पर्धा - मुले व मुली - अन्नमलाई ३२. हॉकी- मुली - ग्वाल्हेर.

१. अखिल भारतीय आंतरविद्यापीठ जुडो स्पर्धेत श्री. सुधीर काटकर यांनी ब्रॉन्झपदक पटकाविले आहे.
२. अश्वमेध आंतरविद्यापीठ नाशिक व्हॉलिबॉल पुरुष गटाच्या स्पर्धेत विद्यापीठाच्या संघाने प्रथम स्थान पटकाविले आहे.
३. अवश्वमेध आंतरविद्यापीठ नाशिक, ॲथेलॅटिक्समध्ये, सुरजित चौधरी याने ट्रिपल जंपमध्ये सुवर्ण पदक तसेच लाँग जंपमध्ये सिल्व्हर पदक मिळविले.
४. तसेच अश्वमेध आंतरविद्यापीठ नाशिक येथे रज्जाक दिनेश, शशिकांत सिंग, सुरजित चौधरी, अनिरुद्ध जोशी तसेच रामेश्वर धपसे यांनी ४ x १०० मीटरमध्ये ब्रॉन्झपदक मिळविले.
५. आंतरविद्यापीठ कुस्ती या संघामधून कु. सरोज यादव, कु. प्रियंका पाटील या विद्यार्थिनीने ब्राँझ पदक मिळविले.
६. आंतरविद्यापीठ धनुर्विद्या या संघामधून श्री. जयपाल काश्यप याने ब्राँझ पदक मिळविले.
७. आंतरविद्यापीठ स्वीमिंगमधून जेवूरे श्रीशाईल या विद्यार्थ्याने सुवर्णपदक मिळविले.
८. आंतरविद्यापीठ, कबड्डी मुले, कोटा विद्यापीठ कोटा या संघाने द्वितीय क्रमांक मिळविला.

अध्यापकांची माहिती:-

१. **डॉ. श्रीमती के.जी. जाधव, प्राध्यापक**
२. **प्रा. एस. जे. चंद्रशेखर**

विशेष कक्ष

या विभागातर्फे महाविद्यालयीन स्तरावरील तसेच विद्यापीठातील विविध शैक्षणिक विभागांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या तसेच विद्यार्थ्यांच्या प्रवेशाच्या बाबतीत आरक्षणाचे काम तपासले जाते.

विद्यापीठ अनुदान आयोग, केंद्र सरकार आणि महाराष्ट्र शासन यांच्यामार्फत मागासवर्गीयांच्या हितसंबंधांच्या दृष्टीने वेळोवेळी जी परिपत्रके काढण्यात येतात त्यांची या विभागामार्फत काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात येते.

सदरील परिपत्रकांची अंमलबजावणी जी महाविद्यालये हेतुपुरस्पर करीत नाहीत अशा महाविद्यालयांवर कडक कारवाई कारण्यात येते. महाविद्यालयात शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नवीन भरती करावयाची असेल तर संलग्नित महाविद्यालयांनी तशा प्रकारचा जाहिरातीचा मसुदा या विभागास सादर करावा लागतो. महाविद्यालयाकडून आलेल्या जाहिरातीच्या मसुद्याचे अवलोकन करुन महाराष्ट्र शासनाच्या शंभर बिंदू (१०० बिंदू) नामावलीनुसार सदरील जागेचे आरक्षण ठरवून

जाहिरातीचा मसुदा संबंधित महाविद्यालयांना पाठविण्यात येऊन मसुद्यात दर्शविल्याप्रमाणे जाहिरात प्रसिद्ध करावी व त्यानुसार बाकी असलेला अनुशेष त्वरित भरुन काढावा असे कळविण्यात येते.

विद्यापीठ अनुदान मंडळ यांच्या आदेशानुसार मा. कुलगुरुंच्या अध्यक्षतेखाली स्थायी समितीमार्फत संलग्नित महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बाबतीत आलेल्या तक्रारींची दखल घेण्यात येऊन कर्मचाऱ्यांवर झालेल्या अन्यायाचे निरसन करण्यात येते. तसेच महाविद्यालयात / विद्यापीठात शिल्लक असलेल्या अनुशेषाबावत सांगोपांग चर्चा करण्यात येऊन समितीने घेतलेल्या निर्णयाची काटेकोरपणे अंमलवजावणी करण्यात येते. याच धर्तीवर महाविद्यालयीन स्तरावर स्थायी समिती स्थापन करण्यात यावी असे आदेश सर्व संबंधित महाविद्यालयांना देण्यात आलेले आहेत व त्यानुसार संबंधित महाविद्यालयामध्ये स्थायी समितीची स्थापना करण्यात आली आहे. सदरील समितीने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल महाविद्यालये या कार्यालयास कळवितात.

उच्च व तंत्रशिक्षण शासन निर्णय क्र. युएएस/१४९५/(३१८३) विशि-४ दिनांक ८ डिसेंबर १९९७ द्वारे विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांना लागू करण्यात आलेल्या सामान्य शासन निर्णय क्र. बीसीसी-१०९७ पत्र क्र. ६३/९७/१६(ब) दिनांक १८/१०/१९९७ अन्वये महाविद्यालयातील / विद्यापीठातील शिक्षक भरतीबाबतचे रोस्टर रजिस्टर संबंधित महाविद्यालयांकडून दोन प्रतीत तयार करुन घेतले. बऱ्याच महाविद्यालयांनी रोस्टर सादर केले आहे. त्यांची तपासणी चालू आहे. भविष्यात ज्या ज्या वेळी महाविद्यालयातील रिक्त जागा भरावयाची वेळ येईल त्या त्या वेळी रोस्टर रजिस्टर बघूनच जाहिरातीचा मसुदा तयार करुनच उर्वरित पदे भरण्यास परवानगी देण्यात येईल. रोस्टर रजिस्टरमुळे आरक्षणविषयक बाबी हाताळण्याचे काम सुलभ झाले आहे.

महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण २००२/(१/०२) विशि-५ दिनांक २८ नोव्हेंबर २००२ प्रमाणे मा. कुलगुरुंनी मान्य केल्याप्रमाणे अकृषि विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांमधील आरक्षणाच्या संदर्भात मूलभूत मार्गदर्शन करण्याकरिता समिती गठीत करण्यात आली. ती खालील प्रमाणे-

१. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, मा. कुलगुरु - अध्यक्ष
२. डॉ. रा. वि. कीर्दक - सदस्य
३. डॉ. ह. पु. जाधव - सदस्य
४. डॉ. एम. एस. आंधळे - सदस्य

सन २००७-२००८ मध्ये अधिव्याख्यात्यांच्या जागा भरण्यास परवानगी असल्यामुळे जवळपास ६२ महाविद्यालयांना अधिव्याख्यात्यांची रिक्त पदे भरण्यास जाहिरातीकरिता मंजुरी देण्यात आली व त्याप्रमाणे कार्यवाही चालू आहे. ज्या महाविद्यालयाने जाहिरातीकरिता परवानगी घेतली पण जाहिरात प्रसिद्ध केली नाही त्यांना स्मरणपत्र पाठवून अहवाल मागविण्यात आला आहे.

महिला तक्रार निवारण समिती

तक्रार समिती (कामाच्या ठिकाणी विद्यार्थिनी व महिला कर्मचाऱ्यांवर होणाऱ्या लैंगिक छळाबाबात) मा. सर्वोच्च न्यायालयाच्या विशाखा निवाडा संदर्भातील आदेशानुसार विद्यापीठ अनुदान आयोग व राष्ट्रीय महिला आयोग, नवी दिल्ली यांच्या निर्देशानुसार मा. कुलगुरु यांनी विद्यापीठात ज्या समितीचे गठण केले आहे, त्या समितीत खालील सदस्यांचा समावेश आहे-

१. डॉ. सौ. मीना पाटील - अध्यक्ष
२. डॉ. सौ. शुभांगी गोटे - सदस्या - समाजशास्त्र विभाग
३. डॉ. सौ. एस. आर. सोनवणे सदस्या- प्राणिशास्त्र विभाग
४. डॉ. सौ. मेबल फर्नांडिस - सदस्या- इंग्रजी विभाग
५. डॉ. सौ. पी.बी. सोमवंशी - सदस्या- उपकुलसचिव (पदव्युत्तर विभाग)
६. ॲड. सौ. अर्चना जोंधळेकर
७. डॉ. दीपक मुळे - कुलसचिव - आमंत्रित
८. सौ. नजमा शेख - सदस्य सचिव

समितीने डिसेंबर २००७ पर्यंतचा अहवाल विद्यापीठ अनुदान आयोग व राष्ट्रीय महिला आयोग नवी दिल्ली यांना पाठविला आहे.

ॲकॅडमिक स्टाफ कॉलेज

१) दिनांक १ जुलै २००७ ते ३० जून २००८ या कालावधीत ॲकॅडमिक स्टाफ कॉलेजने विद्यापीठ अनुदान मंडळाच्या योजनेअंतर्गत खालील उद्‌वोधन वर्ग, उजळणी वर्ग व चर्चासत्र आयोजित केलेले आहेत.

अ.क्र.	वर्गाचा तपशील	कालावधी	संख्या
१.	६९वा उद्‌वोधन वर्ग	२-७-२००७ ते २८-७-२००७	४७
२.	उजळणी वर्ग मराठी	९-८-२००७ ते ३०-८-२००७	५०
३.	उजळणी वर्ग इंग्रजी	७-८-२००७ ते ९-८-२००७	२५
४.	उजळणी वर्ग भूगोल / पर्यटन	१०-९-२००७ ते २९-९-२००७	२६
५.	उजळणी वर्ग अर्थशास्त्र / समाजशास्त्र/समाजकार्य	८-१०-२००७ ते २७-१०-२००७	५०
६.	७० वा उजळणी वर्ग	१०-१०-२००७ ते ६-११-२००७	५०
७.	उजळणी वर्ग हिंदी	१४-११-२००७ ते ४-१२-२००७	३२
८.	७१ वा उद्‌वोधन वर्ग	३-२१-२००७ ते २९-१२-२००७	४८

९.	इंटर डिसीप्लीनरी उजळणी वर्ग राज्यशास्त्र/ लोकप्रशासन /विधी	४-१-२००८ ते २४- १-२००८	४६
१०.	उजळणी वर्ग स्त्री अभ्यास	१६-१-२००८ ते ६- २-२००८	२७
११.	७२ वा उद्‌वोधन वर्ग	१-२-२००८ ते २८- २-२००८	५०
१२.	उजळणी वर्ग इतिहास	४-२-२००८ ते २५- २-२००८	४२
१३.	उजळणी वर्ग रसायनशास्त्र	११-२-२००८ ते १-३-२००८	२४
१४.	उजळणी वर्ग संगणक शास्त्र / गणित / भौतिकशास्त्र	२५-२-२००८ ते १५-३-२००८	३१
१५.	उजळणी वर्ग संशोधन पद्धती	२६-२-२००८ ते १५-३-२००८	३९
१६.	उजळणी वर्ग जैविक शास्त्र	३-३-२००८ ते २१- ३-२००८	३३
१७.	उजळणी वर्ग पर्यावरण अभ्यास	६-३-२००८ ते २१- ३-२००८	४०
१८.	उजळणी वर्ग शिक्षणशास्त्र/मानसशास्त्र	७-३-२००८ ते २८- ३-२००८	३९
१९.	उजळणी वर्ग भारतीय भाषा	१०-३-२००८ ते ३१- ३-२००८	२५

२) उद्‌वोधन व उजळणी वर्गासाठी खालील नामांकित व्यक्तींची अभ्यासपूर्ण व्याख्याने आयोजित करण्यात आली.

१. डॉ. शशिकांत मिरजकर - जवाहरलाल नेहरु विद्यापीठ, न्यू दिल्ली.
२. डॉ. आर. एस. मुन्वर अली - मुंवई विद्यापीठ, मुंवई.
३. डॉ. सरडाना एस. के. - माखनलाल चतुर्वेदी विद्यापीठ, भोपाल.
४. डॉ. मनोज तायडे - संत गाडगेवावा अमरावती, विद्यापीठ, अमरावती.
५. डॉ. भवर आर. के. - दिल्ली विद्यापीठ, दिल्ली.
६. डॉ. इजाज अहमद - नई दिल्ली.
७. डॉ. अशोक हनजोगी - बँगलोर विद्यापीठ, बँगलोर.
८. डॉ. बी. रमेश - गोवा विद्यापीठ, गोवा.
९. डॉ. एस. एफ. पाटील - शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
१०. डॉ. सर्जेराव साळुंखे - शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
११. डॉ. सुरेंद्र जोंधळे - मुंवई विद्यापीठ, मुंवई.
१२. डॉ. श्रीराम परिहार - खंडवा
१३. डॉ. संजय भानावत - राजस्थान विद्यापीठ, राजस्थान.
१४. डॉ. रणबीर चतुर्वेदी - नई दिल्ली.
१५. डॉ. आर. सी. वर्मा - पंजाव विद्यापीठ, पंजाव.
१६. डॉ. रत्नाकर पंडीत - शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
१७. डॉ. इ. वि. मुळे - नई दिल्ली.
१८. डॉ. तपसी वसू - कोलकत्ता विद्यापीठ, कोलकाता
१९. डॉ. के. एस. पिल्ले - चेन्नई.
२०. डॉ. शशी मुदिराज - हैद्राबाद.

विद्यापीठ मुद्रणालय

प्रभारी मुद्रणालय व्यस्थापक - श्री. सुनील पाटील

शैक्षणिक वर्ष २००७-२००८ या वर्षी मुद्रणालयाने निरनिराळ्या प्रकारची छपाईची व बाईंडिंगची कामे केली असून त्यात प्रामुख्याने - विद्यापीठाचे अंदाजपत्रक, विविध अभ्यासक्रमांच्या पुस्तिका, परीक्षा फॉर्मस्, विद्यापीठ परीक्षांतील उत्तीर्णांची पदवी प्रमाणपत्रे, विद्या परिषदेच्या बैठकांचे वृत्तांत इत्यादी. सन २००७-०८ या वर्षी नवीन संचिकांच्या आकाराची पदवी प्रमाणपत्रांची छपाई केली आहे.

विद्यार्थी कल्याण विभाग

संचालक : प्रा. व्ही. एल. सिरसट

०१. विद्यापीठ विभाग विद्यार्थी संसदेची स्थापना २००७-०८ :

विद्यापीठातील विविध विभागांतील विद्यार्थी व विद्यार्थिनी प्रतिनिधींचे नामनिर्देशन झाल्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ विभाग विद्यार्थी संसदेचे गठण करण्यात आले. त्यानंतर सचिवांची निवड करण्यासाठी दि. १२.०९.२००७ रोजी बैठक घेऊन निवडणूक घेण्यात आली. कु. श्रध्दा भाऊसिंग राजपूत, विधी विभाग या विद्यापीठ विभाग विद्यार्थी संसदेच्या सचिवपदी निवडून आल्या.

०२. विद्यापीठ विद्यार्थी संसदेची स्थापना २००७-०८

महाविद्यालयांकडून आलेल्या महाविद्यालयीन विद्यार्थी संसद सचिवांच्या यादीमधून गुणवत्तेनुसार नामांकन केल्यानंतर महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम (४०) प्रमाणे दि. २६.१०.२००७ रोजी विद्यार्थी संसदेच्या अध्यक्ष व सचिवांची निवडणूक घेण्यात आली. त्याप्रमाणे श्री. विशाल प्रसादराव गडदे, स्वामी विवेकानंद वरिष्ठ महाविद्यालय, मंठा, जि. जालना यांची अध्यक्ष म्हणून तर श्री. गणेश दत्तात्रय सोनवणे, आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय, कडा, ता. आष्टी, जि. बीड यांची सचिव म्हणून निवड झाली.

०३. विद्यापीठ विद्यार्थी संसदेचे उद्घाटन २००७-०८ :

विद्यापीठ विद्यार्थी संसदेचे उद्घाटन दि. १० मार्च २००८ रोजी सकाळी ११.३० वाजता सिनेअभिनेता श्री. मिलिंद गवळी यांच्या शुभहस्ते विद्यापीठाच्या महात्मा जोतिबा फुले सभागृहात झाले. अध्यक्षस्थानी मा. कुलगुरु डॉ. नागनाथ कोत्तापल्ले होते. या समारंभास प्रमुख पाहुणे व अध्यक्षांनी विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शनपर विचार मांडले. या प्रसंगी म. वि. वि. मं. संचालक डॉ. ए. जी. खान, कुलसचिव डॉ. अशोक चव्हाण, विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक प्रा. प्रकाश सिरसट हे उपस्थित होते.

०४. राजर्षी शाहू महाराज वक्तृत्व स्पर्धा :

१८ ऑगस्ट २००७ रोजी राजर्षी शाहू महाराज यांचे सामाजिक न्यायाचे धोरण या विषयावर वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेला पद्मश्री वाळासाहेब विखे पाटील सत्यवादीकारक यांच्या देणगीतून मिळणाऱ्या व्याजाच्या रकमेतून बक्षीस देण्यात येते. या स्पर्धेमध्ये विविध महाविद्यालयांतून आणि विद्यापीठाच्या विभागातून आलेल्या एकूण ३७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेमध्ये कु. नाझिया अंजुम, माणिकचंद पहाडे विधी महाविद्यालय, औरंगाबाद यांना प्रथम, कु. भाग्यश्री बापते, स. भु. कला व वाणिज्य महाविद्यालय, औरंगाबाद यांना द्वितीय तर श्री. के. आर. कळकटे, मराठी विभाग, डॉ, बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना तृतीय पारितोषिक प्राप्त झाले. विद्यापीठाच्या वर्धापनदिनी या विजेत्यांना पारितोषिके देण्यात आली.

०५. विद्यापीठ समारंभ व कार्यक्रम :-

विद्यापीठ नामविस्तारदिन :

विद्यापीठाचा १४ वा नामविस्तारदिन दि. १४ जानेवारी २००८ रोजी साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून डॉ. कृष्णा किरवले, कोल्हापूर यांना आमंत्रित करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. कुलगुरु डॉ. नागनाथ कोत्तापल्ले होते. डॉ. कृष्णा किरवले यांनी विद्यापीठाच्या नामविस्तारावर आपले विचार व्यक्त केले. या समारंभास म.वि.वि.मं. संचालक डॉ. ए. जी. खान, मा. कुलसचिव डॉ. अशोक चव्हाण, विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक प्रा. प्रकाश सिरसट हे उपस्थित होते.

छत्रपती शिवाजी महाराज जयंती :

दि. १९.०२.२००८ रोजी विद्यापीठात शिवजयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून मा. डॉ. सदानंद मोरे, पुणे हे उपस्थित होते. शिवजयंतीनिमित्त सकाळी ८.०० वाजता विद्यापीठ गेट ते प्रशासकीय इमारतीपर्यंत शिवाजी महाराजांच्या तैलचित्राची मिरवणूक काढण्यात आली. मा. कुलगुरु डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, म.वि.वि.मं. संचालक, डॉ. ए. जी. खान व कुलसचिव डॉ. अशोक चव्हाण यांनी शिवाजी महाराजांच्या तैलचित्रास पुष्पहार अर्पण करुन मिरवणुकीस सुरुवात झाली. या प्रसंगी प्रा. प्रकाश सिरसट, संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग, विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती :

दि. १४.०४.२००८ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून मा. डॉ. विजय खरे, पुणे हे उपस्थित होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त सकाळी ८.३० वाजता विद्यापीठ प्रवेशद्वार ते प्रशासकीय इमारतीपर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेची मिरवणूक काढण्यात आली. मा. कुलगुरु, डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, म.वि.वि.मं. संचालक डॉ. ए. जी. खान व कुलसचिव डॉ. दीपक मुळे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन मिरवणुकीस सुरुवात झाली. या प्रसंगी प्रा. प्रकाश सिरसट, संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग, विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

०६. कै. वसंतरावजी काळे स्वाभिमान शिक्षण (कमवा आणि शिका) योजना :

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या संकल्पनेनुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठामध्ये कै. वसंतरावजी काळे स्वाभिमान शिक्षण (कमवा आणि शिका) योजना विद्यार्थी कल्याण विभागातर्फे राबवली जाते. या योजनेचा फायदा गरीब, होतकरु व गुणवंत विद्यार्थ्यांना होत आहे. या योजनेअंतर्गत सन २००७-०८ या वर्षात एकूण ३९५ विद्यार्थी व विद्यार्थिनींनी या योजनेचा लाभ घेतला. यात पदव्युत्तर वर्गाचे ३०० व एम.फिल./ पीएच.डी. करणाऱ्या ४५ विद्यार्थ्यांचा समावेश होता पैकी ५० विद्यार्थिनी होत्या. या योजनेअंतर्गत विविध उपक्रम राबविले जातात.

०१. २२ सप्टेंबर २००७ रोजी कर्मवीर भाऊराव पाटील यांची जयंती साजरी करण्यात आली. त्यामध्ये वक्त्यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्याच्या संदर्भात विचार मांडले.

०२. फाईल निर्मिती केंद्राजवळील शेतात केशर, लंगडा जातीच्या आंबा रोपांची लागवड करण्यात आली.

०३. दि. २७ ऑक्टोबर २००७ रोजी कमवा आणि शिका योजनेचे कै. वसंतरावजी काळे स्वाभिमान शिक्षण योजना असे नामकरण नारळीवाग येथे मा.ना.श्री. शरदचंद्रजी पवार, कृषिमंत्री, भारत सरकार यांच्या हस्ते लावण्यात आला.

०७. पाचवा महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ सांस्कृतिक युवक महोत्सव-इंद्रधनुष्य-२००७ :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ परिसरात दि. २ ते ५ नोव्हेंबर, २००७ दरम्यान पाचवा महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ सांस्कृतिक युवक महोत्सव- इंद्रधनुष्य आयोजित करण्यात आला होता. या युवक महोत्सवात महाराष्ट्र राज्यातील १८ विद्यापीठांनी सहभाग घेतला. या महोत्सवाचे उद्घाटन २ नोव्हेंबर २००७ रोजी सायंकाळी ५.०० वा. मा. खा. चंद्रकांतजी खैरे, खासदार, औरंगाबाद लोकसभा मतदारसंघ यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले हे होते. तसेच या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून मा. ना. राजेंद्र दर्डा, विधानसभा सदस्य (औरंगाबाद पश्चिम), डॉ कल्याण काळे, विधानसभा सदस्य (औरंगाबाद पूर्व), संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या कुलगुरु डॉ. कमलसिंग, महामहिम राज्यपालांचे उपसचिव श्री. विनायक दळवी आदींची उपस्थिती होती. तसेच व्यासपीठावर म.वि.वि.मं. संचालक डॉ. ए. जी. खान, कुलसचिव डॉ. गजानन सुरासे व प्रा. प्रकाश सिरसट, संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग हे उपस्थित होते.

या युवक महोत्सवामध्ये ४० मान्यवर परीक्षकांनी विद्यार्थी कलावंतांच्या कलागुणांचे परीक्षण केले. दि. २ ते ५ नोव्हेंबर २००७ या कालावधीत संगीत, नृत्य, वामयीन, नाटय, व ललित कला व गटात एकूण २३ कलाप्रकारांत स्पर्धा झाल्या.

या युवक महोत्सवाचा समारोप व बक्षीस वितरण समारंभ दि. ५ नोव्हेंबर २००७ रोजी दुपारी १२.०० वाजता प्रसिध्द सिनेअभिनेता मिलिंद गुणाजी यांच्या हस्ते झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मा. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी भूषविले. या समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून मा. राज्यपालांनी नियुक्त केलेल्या निरीक्षण समितीचे डॉ. राजकिशोर गुप्ता, प्राचार्य, संत मुक्ताबाई महाविद्यालय, मुक्ताईनगर, जळगाव, डॉ. दत्ता घुगे, सांस्कृतिक समन्वयक, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक व श्री. गणेश कोवळे, प्रभारी कुलसचिव यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक

हे उपस्थित होते. तसेच विहारच्या मा. राज्यपालांनी नियुक्त केलेल्या समितीचे सदस्यही उपस्थित होते. त्याचबरोबर व्यासपीठावर म.वि.वि.मं. संचालक डॉ. ए. जी. खान, कुलसचिव डॉ. गजानन सुरासे, विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक प्रा. प्रकाश सिरसट आदींची उपस्थिती होती.

या युवक महोत्सवात सर्वसाधारण विजेतेपद मुंबई विद्यापीठाने प्राप्त केले तर संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने द्वितीय क्रमांक पटकाविला. डॉ. बाबासाहेब आंबडकर मराठवाडा विद्यापीठाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाचे औचित्य साधून मा. कुलगुरु डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी गोल्डन बॉय व गोल्डन गर्ल हे पुरस्कार घोषित केले होते. गोल्डन बॉयचा पुरस्कार श्री योगेश कुंभार व गोल्डन गर्लचा पुरस्कार कु. मीनल आवळकर यांनी पटकाविला.

०८. केंद्रीय आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सव :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद आणि जे.ई.एस. महाविद्यालय, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २७ ते ३० डिसेंबर या कालावधीमध्ये केंद्रीय आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सवाचे आयोजन जे.ई.एस. महाविद्यालय, जालना येथे करण्यात आले होते. यासाठी ९६ महाविद्यालयांतील एकूण २५०० विद्यार्थी व विद्यार्थिनी कलावंतांनी सहभाग घेतला.

संगीत, नृत्य, नाटय, ललित कला, महाराष्ट्राच्या लोककला या मुख्य कलाप्रकारातील एकूण ३२ कलाप्रकारांचे या महोत्सवात सादरीकरण करण्यात आले. दि. २७ डिसेंबर २००७ रोजी सकाळी ८.०० वा. शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये पारंपरिक वेशभूषा, विविध प्रबोधनपर देखावे सादर करण्यात आले. सदर युवक महोत्वाचे उद्घाटन मा.ना. राजेश टोपे, नगरविकास राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. कुलगुरु डॉ. नागनाथ कोत्तापल्ले होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून खा. रावसाहेब दानवे, आ. अरविंद चव्हाण, जिल्हा परिषद अध्यक्ष अनिरुध्द खोतकर, माजी आमदार कैलास गौरंटयाल, माजी नगराध्यक्ष भास्करराव अंबेकर, जेईएस संस्थेचे अध्यक्ष पुरुषोत्तम वगाडिया, सचिव श्रीनिवासजी भक्कड यांची उपस्थिती होती. तसेच व्यासपीठावर डॉ. अशोक चव्हाण, कुलसचिव डॉ. आर. एस. अग्रवाल, प्राचार्य, जे. ई. एस. महाविद्यालय, जालना, प्रा. प्रकाश सिरसट, संचालक विद्यार्थी कल्याण, श्री. विशाल गडदे, अध्यक्ष, विद्यापीठ विद्यार्थी संसद व श्री. गणेश सोनवणे, सचिव, विद्यापीठ विद्यार्थी संसद यांची उपस्थिती होती.

सदर युवक महोत्सवाचा समारोप दि. ३० डिसेंबर २००७ रोजी मुख्य रंगमंचावर दुपारी ४ वाजता झाला. समारोप व पारितोषिक वितरण समारंभ सिने-नाटय अभिनेत्री विभावरी प्रधान यांच्या हस्ते झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. कुलगुरु डॉ. नागनाथ कोत्तापल्ले होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून आ. आ. अर्जुन खोतकर, आ. विक्रम काळे, नगराध्यक्षा कल्पनाताई लाहोटी, संस्थेचे अध्यक्ष पुरुषोत्तम वगाडिया, सचिव श्रीनिवास भक्कड, म.वि.वि.मं. संचालक डॉ. ए. जी. खान कुलसचिव डॉ. अशोक चव्हाण, डॉ. आर. एस. अग्रवाल, प्राचार्य, जे.ई.एस. महाविद्यालय, जालना व प्रा. प्रकाश सिरसट, संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग हे उपस्थित होते. तसेच व्यासपीठावर विद्यापीठ विद्यार्थी संसदेचे अध्यक्ष व सचिव अनुक्रमे श्री. विशाल गडदे व श्री. गणेश सोनवणे यांचीही उपस्थिती होती.

०९. पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ युवक महोत्सवात सहभाग :

दि. १९ ते २३ डिसेंवर २००७ या दरम्यान पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ युवक महोत्सव लक्ष्मीबाई राष्ट्रीय शारीरिक प्रशिक्षण संस्था, ग्वालियर, मध्य प्रदेश येथे संपन्न झाला. या युवक महोत्सवात आपल्या विद्यापीठाच्या ४० व्यक्तीच्या संघाने सहभाग घेतला. या संघाचे नेतृत्व प्रा. गोविंद पवार यांनी केले.

या युवक महोत्सवात विद्यापीठाने तीन पुरस्कार प्राप्त केले. चैतन्य कुंभकर्ण याने ऑन द स्पॉट पेन्टिंगमध्ये प्रथम, प्रफुल्ल काळे यांनी तबलावादनात द्वितीय तर विद्यापीठाच्या ललित कला प्रकारातील इन्स्टॉलेशन कलाप्रकारातील कलावंतांनी द्वितीय क्रमांक पटकाविला.

१०. राष्ट्रीय युवक महोत्सवात सहभाग :

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे दि. २० ते २४ जानेवारी, २००८ या दरम्यान राष्ट्रीय युवक महोत्सव आयोजित करण्यात आला होता. या युवक महोत्सवात प्रा. गोविंद पवार यांच्या नेतृत्वाखालील पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ युवक महोत्सवातील वक्षीस विजेत्या ६ विद्यार्थी कलावंतांनी विद्यापीठाचे प्रतिनिधित्व केले.

११. विद्यार्थी वसतिगृहे :

विद्यापीठाचे एकूण पाच विद्यार्थी वसतिगृहे व एक विद्यार्थी विश्रामगृह आहे. या वसतिगृहाकरिता डॉ. सतीश दांडगे, डॉ. बी. एन. डोळे, श्री. सुनील नरवडे व श्री. सी. एन. कोकाटे हे वसतिगृह अधीक्षक म्हणून कार्यरत आहेत. दरवर्षी प्रमाणे वसतिगृहदिन साजरा करण्यात आला.

१२. विद्यार्थिनी वसतिगृहे :

विद्यापीठ प्रांगणात तीन विद्यार्थिनी वसतिगृहे व प्रियदर्शिनी अशी चार विद्यार्थिनी वसतिगृहे आहेत. डॉ. सौ. मीना पाटील व डॉ. एच. जे. वानखेडे या वसतिगृह अधीक्षिका म्हणून कार्यरत आहेत. या चार वसतिगृहांत एकूण ३०० विद्यार्थिनींची राहण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. तसेच प्रियदर्शिनी या वसतिगृहात शासकीय कोटयातून ५० मुलींना प्रवेश देण्यात आला होता. दरवर्षी प्रमाणे वसतिगृहदिन साजरा करण्यात आला.

१३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातर्फे दरवर्षी महानुभाव साहित्यावर निबंध व वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात येते. ही स्पर्धा महानुभाव आश्रम, श्रीकृष्ण मंदिर, पैठण रोड, औरंगाबाद येथे आयोजित केली जाते. या स्पर्धेचा विषय महानुभाव साहित्य : काल, आज आणि उद्याङ हा होता. दरवर्षी ३० डिसेंबर रोज़ी या दोन्ही स्पर्धा घेतल्या जातात. बक्षीस वितरणाचा कार्यक्रम ३१ डिसेंबर रोजी घेतला जातो. सवंध महाराष्ट्रातून महाविद्यालयीन व विद्यापीठातील विद्यार्थी / विद्यार्थिनी या स्पर्धेत सहभागी होतात. महाराष्ट्राबाहेरील चौदा विद्यापीठांनासुध्दा या स्पर्धेसाठी परिपत्रक पाठवून आमंत्रित केले जाते.

विद्यार्थिनी वसतिगृह:-

वसतिगृह क्र. १ व २ मध्ये दि. १५ मार्च २००८ रोजी वसतिगृह दिन साजरा करण्यात आला होता. त्या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. श्री. नागनाथ कोत्तापल्ले सर व कुलसचिव डॉ. अशोक चव्हाण हे उपस्थित होते.

वसतिगृह दिनानिमित्त रांगोळी स्पर्धा, मेंदी, नृत्य, फॅन्सी ड्रेस, मूक अभिनय इत्यादी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. ७ मार्च २००८ रोजी NIMA तर्फे Health Check-up Camp. आयोजित केला गेला होता.

मध्यवर्ती सहकारी ग्राहक भांडार मर्यादित

कार्यकारी संचालक मंडळः-

१)	प्रा. शांतीनाथ वनसोडे वित्त व लेखाधिकारी	-	अध्यक्ष -	विद्यापीठ प्रतिनिधी
२)	डॉ. गौरी फराह नाझ वाणिज्य विभाग	-	संचालक -	विद्यापीठ प्रतिनिधी
३)	श्री. आय. आर. मंझा उपकुलसचिव	-	संचालक -	विद्यापीठ प्रतिनिधी
४)	डॉ. एस. वी. जगदाळे देवगिरी महाविद्यालय	-	संचालक -	कॉलेज प्रतिनिधी
५)	डॉ. एम. एस. गोर्डे पाटील विवेकानंद महाविद्यालय	-	संचालक -	कॉलेज प्रतिनिधी
६)	श्री. व्ही. बी. झोपडे लेखा विभाग	-	संचालक -	मागासवर्गीय प्रतिनिधी
७)	श्री. छगन पी. सलामपुरे ग्रंथालय विभाग	-	संचालक -	मागासवर्गीय प्रतिनिधी
८)	श्री. एस. व्ही. देशपांडे परीक्षा विभाग	-	संचालक -	कर्मचारी प्रतिनिधी
९)	श्रीमती गोदावरीवाई सोलाट गार्डन विभाग	-	संचालक -	महिला कर्मचारी
१०)	मा. ना. श्री. संदिपान भुमरे	-	संचालक -	बँक प्रतिनिधी
११)	विभागीय सहनिबंधक सहकारी	-	संचालक -	शासकीय प्रतिनिधी संस्था
१२)	श्री. एन. सी. श्रॉफ. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा ग्राहक भांडार म., औरंगाबाद.	-	व्यवस्थापक-	पदसिद्ध मेंबर

संस्थेचे भाग भांडवल व सभासदांची संख्या:-

विवरण	वर्ग	संख्या	रक्कम
१) विद्यापीठ	अ	१	५०,०००=००
२) महाविद्यालये	ब	११	२२,०००=००
३) व्यक्तिगत	क	११४०	४७,४९५=००
४) सहकारी ग्राहक संस्था	ड	४	४,२५०=००
५) महाराष्ट्र शासन	फ	१	१,३१,०००=००
६)	इ	४७	२३५=००
एकूण		१२०४	२,५४,९८०=००

व्यापारी उलाढालींचा तक्ता -

१) आरंभी शिल्लक	२,४१,५२८=००
२) माल खरेदी	३३,५५,९३७=००
३) माल विक्री	३९,६३,८३१=००
४) व्यापारी नफा	३,५१,६५१=००
५) निव्वळ नफा	१,०६,८३९=००
६) दि. ३१/०३/२००८ अखेर एकूण नफा	४,८०,८३८=००
७) दि. ३१/३/२००८ अखेर मालाचा साठा	२,९६,६२०=००

विद्यापीठ ग्राहक भांडारामार्फत सर्व साहित्य योग्य किमतीस ग्राहकांना व विद्यापीठ उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने संस्थेच्या संचालक मंडळाच्या ध्येय-धोरणाच्या निर्णयानुसार सर्वतोपरी प्रयत्न करुन किराणा, जनरल, कापड, रेडिमेड व स्वस्त धान्य, रॉकेल, विद्युत साहित्य, स्टेशनरी, युनिफार्म वगैरे तयार करुन मुद्रणालयात मशीन ऑईल व सर्व प्रकारच्या भेट वस्तू इ. ठेवून जास्तीत जास्त ग्राहकांना सेवा देण्यासाठी प्रयत्न करण्यात आला आहे.

या वर्षात संस्थेने शासकीय भाग भांडवलापोटी रु. १०,०००/- शासकीय कोषागारात रोख भरणा करुन संस्थेने शासकीय कर्जाची रक्कम कमी करण्यात आली आहे. या वर्षात मा. कुलगुरु यांच्या सहकार्यामुळेच संस्थेच्या व्यवहार सतत तीन वर्षांपासून प्रगतिपथावर आहे.

विद्यापीठ ग्राहक भांडारात शासकीय लेखापरीक्षणात सन २००६-०७ व २००७-०८ या दोन्ही वर्षांत लेखापरीक्षण (अ) वर्ग प्राप्त झाला आहे.

विद्यापीठ रोजगार व स्वयंरोजगार माहिती व मार्गदर्शन केंद्र

विभागप्रमुखाचे नाव :- १) डॉ. एम. एस. शिनगारे
२) श्री. ओ.शं. जाधव, सहायक संचालक

विद्यापीठ रोजगार व स्वयंरोजगार माहिती व मार्गदर्शन केंद्र हे रोजगार व स्वयंरोजगार विभाग महाराष्ट्र शासन आणि विद्यापीठ प्रशासन यांच्या समन्वयातून आस्थापित झालेले कार्यालय आहे. जून १९६५ मध्ये या कार्यालयाची सुरुवात झाली.

केंद्राचे कार्य

१. विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमांची व नोकरी या विषयाची माहिती देणे आणि मार्गदर्शन करणे.
२. विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक परीक्षेसंबंधी पूर्वतयारी करण्याबाबत व्यवसाय मार्गदर्शन करणे.
३. महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना व्यवसाय मार्गदर्शन करण्यासाठी महाविद्यालयांना भेटी देणे.
४. व्यावसायिक तांत्रिक पदवीधर आणि पदव्युत्तर पदविधारक विद्यार्थ्यांची नोंदणी करणे.
५. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक पात्रतेत वाढ व नूतनीकरणाची नोंद करणे.
६. उद्योजकाकडून येणाऱ्या मागणीच्या संदर्भात योग्य सक्तीची निवड करुन पाठवणी करणे.
७. उमेदवारांना व्यक्तिगत मार्गदर्शन करणे.

नोंदणीसंबंधी

दिनांक ३० जून २००८ रोजी नोंदणीपटावर एकूण ८७७९ उमेदवार होते. पैकी पुरुष ६८१२ आणि स्त्री १९६७ उमेदवार आहेत. एकूण उमेदवारांपैकी पदव्युत्तर ५६२९ वर व्यावसायिक आणि तांत्रिक पात्रताधारक उमेदवार ३१५० आहेत.

नोंदणीचा तपशील

१.	नोंदणी पटावरील संख्या	-	८७७९
२.	अधिसूचित केलेल्या उमेदवारांची संख्या	-	०५५४
३.	शिफारस केलेल्या उमेदवारांची संख्या	-	२३३८
४.	नोकरीस लागलेल्या उमेदवारांची संख्या	-	०१०
५.	प्रलंबित रिक्त पदे	-	०३५०
६.	मागील वर्षात ३८ महाविद्यालयांत नियुक्त केलेल्या उमेदवारांची संख्या	-	२९८

रोजगार प्रोत्साहन कार्यक्रम

अनुभव नसलेल्या उमेदवारांना अनुभव यावा म्हणून शासनातर्फे अशा विद्यार्थ्यांना शैक्षणिक पात्रतेनुसार रुपये ३००/- ते १०००/- पर्यंत विद्यावेतन स्वयंरोजगार कार्यालयामार्फत देण्यात येते. या अनुभव प्राप्त उमेदवारांना उद्योजकांनी सेवेत सामावून घ्यावे अशी अपेक्षा असते. अहवाल वर्षात या कार्यक्रमांतर्गत झालेल्या कामाचा तपशील पुढील प्रमाणे-

१.	अधिसूचित रिक्त पदांची संख्या	-	१०३
२.	शिफारस केलेल्या उमेदवारांची संख्या	-	४८०
३.	प्रशिक्षणार्थी म्हणून नोकरीस लागलेल्या उमेदवारांची संख्या	-	००८.

शैक्षणिक व व्यावसायिक मार्गदर्शन कार्य

१.	व्यक्तिगत मार्गदर्शन	-	०५२३
२.	गट चर्चा उपस्थिती	-	००१०
३.	सामूहिक उपस्थिती	-	०२३१
४.	माहिती केंद्रास भेट देणाऱ्यांची संख्या	-	३२५८
५.	इतर विद्यापीठांकडून प्राप्त झालेली माहिती पत्रके	-	००१०
६.	ग्रंथालयातील एकूण पुस्तके	-	०३८२
७.	विदेशांतील शैक्षणिक माहिती पत्रके	-	००००
८.	नोंदणीपूर्व मार्गदर्शन केलेल्यांची संख्या	-	०४९८

माहिती कक्ष

केंद्रात इतर विद्यापीठे आणि संस्था यांच्याकडून येणारी माहिती पत्रके, जाहिराती इ. माहिती वेगवेगळ्या फाइल्समध्ये लावली जातात अशा २७ फाइल्स विद्यार्थ्यांना माहितीसाठी तयार करुन ठेवलेल्या आहेत. परदेशी माहितीपत्रके, अभ्यासक्रमांतील प्रवेश, शिष्यवृत्ती, प्रशिक्षण इ. विद्यार्थ्यांना मिळू शकते. केंद्रात काही संदर्भ ग्रंथ विकत घेतलेले आहेत. विद्यार्थ्यांना ती केंद्रातच वाचण्यासाठी मिळतात.

गटचर्चा

अहवाल वर्षात १० गट चर्चा आयोजित करण्यात आल्या होत्या.

ग्रंथालय कक्ष

१. **ग्रंथ संख्या -** स्पर्धा परीक्षेस उपयुक्त अशी मिळून ३८२ पुस्तके आहेत.

२. **नियतकालिके** - विभागाच्या ग्रंथालयात १० वर्तमानपत्रे, ८ साप्ताहिके व १६ मासिके येतात. दर दिवशी ५० विद्यार्थी या ज्ञान साहित्याचा उपयोग घेतात.

३. **कात्रणसेवा** - विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी विभागाच्या ग्रंथालयात वृत्तपत्र कात्रण सेवा देण्यात येते. या सर्व वृत्तपत्रांमधील जाहिराती कापून एकत्र संकलित करुन एका स्वतंत्र संचिकेत नस्तीकरण करुन ठेवल्या जातात व विद्यार्थ्यांना गरजेनुसार तसेच पाहिजे तेव्हा या कात्रणसेवेचा उपयोग होतो.

४. **व्यवसाय मार्गदर्शन पत्रिका** - रोजगार व स्वयंरोजगाराबाबत उपयुक्त माहिती देणारी द्विमासिक पत्रिका तयार करुन संलग्न महाविद्यालयांना पाठविण्यात येते. या पत्रिका प्रकाशनामुळे ग्रामीण महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना नोकरी व व्यवसायाबाबत उपयुक्त माहिती मिळते.

५. **चर्चासत्र** - दिनांक ३१ मार्च २००८ रोजी माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील रोजगाराच्या संधी या विषयावर एक दिवशीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. अनेक मान्यवरांच्या मार्गदर्शनाचा विद्यार्थ्यांना लाभ झाला.

आरोग्य केंद्र

दि. ०१/०७/२००७ ते ३०/०६/२००८ या कालावधीतील आरोग्य केंद्राद्वारे केल्या जाणाऱ्या कार्याचा उल्लेख खालीलप्रमाणे आहे.

१) कर्मचाऱ्यांना सोईस्कर अशा आरोग्य केंद्राचा वेळा:-

आरोग्य केंद्र सकाळी ८.०० ते ११.३० दुपारी ३.०० ते ६.३० या वेळेस कार्यरत असते. त्यामुळे शहारातून येणाऱ्या कर्मचाऱ्यांना येण्यापूर्वी व परतताना त्यांचा लाभ घेता येतो. प्रत्येक शनिवारीसुध्दा आरोग्य केंद्र कार्यरत असते. शनिवारी किंवा सोमवारी एखादी सार्वजनिक सुट्टी असल्याससुध्दा आरोग्य केंद्र सकाळी कार्यरत ठेवले जाते व रुग्णांच्या औषधोपचारामध्ये नियमितपणा राखावा हे पाहिले जाते. दंत रुग्णांसाठी दंत विभाग सुध्दा कार्यरत आहे. आणि मुलीसाठी महिला वैद्यकीय अधिकाऱ्यांची सुविधा करण्यात आलेली आहे.

२) आरोग्य केंद्राच्या वेळाव्यतिरिक्त वैद्यकीय सेवा:-

२००७ - २००८ सालामध्ये अंदाजे १०० रुग्णांना आरोग्य केंद्राच्या वेळेनंतर सुध्दा वैद्यकीय सेवा उपलब्ध करुन दिली गेली.

३) अत्यवस्थ रुग्णांसाठी वैद्यकीय सेवा:-

विद्यापीठ आवारातील अंदाजे १०० रुग्णांना २००७-२००८ सालामध्ये त्यांचा घरी जाऊन औषधोपचार दिले गेले.

४) रुग्णसंख्या व औषधोपचार शुल्क:-

दि. ०१/०७/२००७ ते ३०/०६/२००८ पर्यंत एकूण ८१०४ रुग्णांनी आरोग्य केंद्राचा लाभ घेतला. आरोग्य केंद्रातून रुग्णांना सर्व प्रकारची औषधे अगदी नाममात्र शुल्कात प्राप्त होतात. या कालावधीत रुग्णाकडून एकूण रु. २६.४३७/- रक्कम फीच्या स्वरुपात जमा झालेली आहे.

५) अंदाजे १५० खेळाडूंची वैद्यकीय तपासणी केली गेली.

अशा प्रकारे आरोग्य केंद्राचा लाभ जास्तीत जास्त विद्यार्थी, खेळाडू, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना सहजपणे उपलब्ध होईल या दृष्टीने कार्यरत आहे.

विद्यापीठ उद्यान विभाग

राष्ट्रीय फळबाग योजनेअंतर्गत विद्यापीठाने १४० एकरवर महत्त्वाकांक्षी व्यावसायिक प्रकल्प रावविला आहे. हा प्रकल्प मा. ना. शरद पवार, केंद्रीय कृषिमंत्री, भारत यांच्या प्रेरणेने उभा राहिला. दि. २७ ऑक्टोबर २००७ रोजी मा. ना. शरद पवार यांनी या प्रकल्पास भेट देऊन पाहणी केली व समाधान व्यक्त केले. तसेच राष्ट्रीय फळबाग मंडळ, नाशिक, सहायक संचालक श्री. उमेदसिंग, जिल्हा कृषी अधिकारी, व्यवस्थापक बँक ऑफ महाराष्ट्र यांनी संयुक्तपणे दि. २४ मार्च २००७ रोजी फळबागेची तपासणी केली व श्री. उमेदसिंग, सहायक संचालक यांनी फळबागेवद्दल समाधान व्यक्त केले व प्रसंशा केली. सध्या फळबागेतील सर्व फळझाडे चांगल्या स्थितीत आहेत. परिसर विकासअंतर्गत असणाऱ्या या फळबागेच्या व्यवस्थापनेचे काम विद्यापीठ उद्यान पाहते.

विद्यापीठ उद्यानाने नाटयशास्त्र विभागासमोर व विद्यार्थी विरंगुळा केंद्र या ठिकाणी नवीन उद्याने तयार केली. विद्यापीठ सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त विविध विभागांत वृक्षारोपणासाठी रोपांचा पुरवठा केला व विद्यापीठातील विविध कार्यक्रमांसाठी शोभेच्या झाडांच्या कुंडया पुरविल्या. विद्यापीठ वार्षिक पदवीदान समारंभ कार्यक्रमाची तयारी करण्यात आली.

तसेच विद्यापीठ उद्यानांतर्गत येणारे उद्याने प्रशासकीय इमारतीसमोरील उद्यान, परीक्षा भवनासमोरील उद्यान, सामाजिक शास्त्रे विभाग उद्यान, इतिहास संग्रहालय उद्यान, नवीन नाटयगृह उद्यान, विश्रामगृह उद्यान, कुलगुरु निवास व कुलसचिव निवास उद्यान इत्यादी उद्यानाची देखभाल करण्यात आली आहे.

महात्मा फुले प्रतिष्ठान

महात्मा फुले प्रतिष्ठानांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या उपक्रमांची माहिती खालीप्रमाणे-

१. दिनांक २४ आणि २५ ऑगस्ट २००७ रोजी महात्मा फुले प्रतिष्ठान आणि मत्स्योदरी संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने महिला परिवर्तन शिविराचे आयोजन करण्यात आले होते.

२. दिनांक ३ व ४ ऑक्टोबर २००७ रोजी महात्मा फुले प्रतिष्ठान आणि जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे कला महाविद्यालय, पाटोदा, जि. बीड यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रामीण शिक्षण, स्त्री शिक्षण आणि परिवर्तन या विषयावर शिविर घेण्यात आले.

३. दिनांक ९ ऑक्टोबर २००७ रोजी महात्मा फुले प्रतिष्ठान आणि मुक्तानंद कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थी प्रबोधन शिविर घेण्यात आले.

४. दिनांक १२ ऑक्टोबर २००७ रोजी श्री. लक्ष्मण माने माजी विधान परिपद सदस्य, सातारा यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले.

५. दिनांक १७ व १८ ऑक्टोबर २००७ रोजी महात्मा फुले प्रतिष्ठान आणि कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय वाशी, जि. उस्मानाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थी नेतृत्व शिबिर घेण्यात आले.

६. जयभवानी सेवाभावी संस्था, धुमेगाव आणि महात्मा फुले प्रतिष्ठानच्या वतीने १२ फेब्रुवारी २००८ रोजी वेलगुलवाडी, ता. गेवराई, जि. बीड येथे कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे शिबिर घेण्यात आले.

राजर्षी शाहू महाराज संशोधन केंद्र

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University has intiated Rajarshi Shahu Reserarch Centre to promote research, training and extension of knowledge leading towards social transformation. Innovative ideas, sturnture and nethod will be evolved to pursue the aims and objectives of the centre. The Fellows (Ipermanent, visiting honorary and affiliated) with waried research interests from college; university and social movements will work together to build the institution.

Following programs were undertaken.

1] Rajarshi Shahu Maharaj Jayanti : Govindrao Panasare delivered a lecture on Shahu Mahaja's vision of caste annihilation on 26 June 2007.

2] Workshop organized for the training of research students and activists working in the survey project on Caste and Patriarchy held on 15th Dec 2007
Resourece persons: Prof. Surendra Jondhale University of Mumbai,
: Prof. Rajeet Paradeshi Dhule,
: Prof. vandana Sonalkar Dr. BAMU Aurnagabad
: Prof. Umesh Bagade Dr. BAMU Aurangabad
80 research students and activists participated in the workshop

3] Third National Anti-Caste conference on Caste and Patriarchy hald on 17th to 19th January 2008 with association Krantisinh Nana Patil Academy, Tarabai Shinde women study center Dr. BAMU Aurangabad.

Prof. Kumud Pawade (Nagpur) inaugurated the conference and Prof. Gabriel Dietrich (Madurai) delivered the key-note address Surendra Jondhale University of Mumbai Prof. Ranjeet Paradeshi Dhule, Prof. Vandana Sonalkar Dr. BAMU Aurangabad, Prof. Umesh Bagade Dr. BAMU Aurangabad, Varsha Ayyar (Mumbai), Prof. Pushpa Gaikwad (Aurangabad), Prof. Nivedita Rao (Mumbai), Sachin Garud (Islampur), Prof. Devendra Ingale (Jalgoan), Prof. Namrata Ganeri (Mumbai), Mrs. Supriya Gaikwad (A`nagar) , Mr. Sapatarshi Mandal (Kolkatta), Mr. Sarawate(Dehli) Prof. Bajarang Tiwari (Dehli), Mrs Sangita Thosar (Pune), Mrs. Niramala Jadhav (Pune), presented their papers in the conference.

250 students researcher and activist participated in the conference. Com. Sharad Patil delivered valedictory address.

4] Workshop on research Methodology held on 12th Feb 2008.
Resource persons: Dr. Kishor Gaikwad Dept. of History University of Mumbai.
: Mr. Mahesh Gavaskar, editor Samajprabodhan Patrika.
150 research students participated in the workshop

5] Seminar organized on Kosambi's Historiography held on 20, 21 Feb 2008

सहकार महर्षी बाळासाहेब पवार संशोधन केंद्र

सहकार महर्षी बाळासाहेब पवार संशोधन केंद्राचे उदघाटन २१ एप्रिल २००८ रोजी, प्रख्यात अर्थतज्ञ व पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. नरेंद्र जाधव यांच्या हस्ते झाले.

लोकनेते बाळासाहेब पवार यांच्या पुण्यतिथीनिमित्त ज्येष्ठ पत्रकार श्री. नागनाथ फटाले यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले.

ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्र

Academic Year 2007-2008.

During the academic year 2007-2008 our focus was largely on local outreach work in Aurangabad city, and among students and teachers of affiliated colleges. We organized several workshops, lectures and discussions in collaboration with local colleges and NGO's A Schedule of the local programmes organized is given below:-

July 14th 2007: A one-day workshop on Sex Education in Schools was organized for school teachers of city schools, in the context of a current controversy over introduction of Sex Education into the school currilculum for Std. 9 and 10. The objective was to generate awareness about the need for this type of education, and to find out the problems faced by teachers in teaching these subjects and involving the students. Local doctors, psychiatrists and social workers addressed the teachers. Incidentally, at the time of writing this report, the Government of Maharashtra has in response to protests from Opposition legislators suspended the introduction of sex education in schools, so that it will not be added to the curriculum of the coming school year.

August 18th , 2007 : A one-day workshop on Gender Equality and Social Justice was held for teachers and students in the National Service Scheme from

affiliated colleges, Guest speakers from Pune and Beed were invited. About sixty school teachers took part.

September 29th 2007 : A half-day Workshop aimed at generating awareness about the problem of Sexual Harassment at the Workplace was held. Members of Sexual harassment Committees from affiliated colleges were invited to participate. Interactive sessions and briefings by legal and medical experts were organized. Seventy teachers participated.

November 28th 2007 (Mahatma Jyotiba Phule's Birth Anniversary):-

A half-day workshop on the Sachar Committee Report on socio-economic condition of the Muslim Community in India, with special reference to the problems of Muslim women, was held at the Sir Sayyad College. Noted Social workers Anwar Rajan and Razia Patel addressed the teachers and students of this Muslim-minority college, and there was a lively discussion. This college has a large number of women students, and they were prominent in the audience for this workshop.

December 7th 2007 : A one-day Workshop on The Role of the Media in Promoting Gender Equality was held at the Harniman College of Journalism. Students of journalism from the University Department of Mass Communications and Journalism, and afflicted city colleges were invited.

Both the above programmes aimed especially at reaching out to the Muslim community in Aurangabad. For this reason, they were organized in Muslim minority colleges and campuses. The Aurangabad branch of the Andhashraddha Nirmulan Samiti (ANIS) joined the Tarabai Shinde Women's Studies Centre in all these activities, they had adopted the theme of gender equality for the currnt year.

December 22nd and 23rd 2007 : A Worksop was held in collaboration with the Bharat Jan vigyan Samuday for students of this university and activists of the BGVS. Among the subjects disussed were promotion of gender equality while working in social reform activities, the problem of education for the girl child, and early marriage of girls.

January 3rd,2008 (Birth Anniversary of Savitribai Phule): We celebrated Savitribai phule Jayanti by organizing a yuvati melawa, or one-day festival for women college students. The girls were given a range of topics and invited to express themselves through a variety of media, such as posters, one-act plays and speeches. There were no Prizes, but panels of experts comented on the students performance.About 100 women students from different city colleges enthusiastically took part.

January 17th , 18th and 19th , 2008 : The Centre organized a three-day National Conference on Caste and Patriarchy in collaboration with the Rajarshi Shahu Maharaj Research Centre of this University, and the Krantisinh Nana Patil Akademi, a non-profit making association working to spread social

awareness. The Conference attracted paper presenters from all over Maharashtra and from Delhi and Varanasi. It was inaugurated by Dr. Gabriele Dietrich, veteran feminist, well-known writer and activist from Madurai. Other resource persons included Kumud Pawade, Pushpa Bhave, Sulabha Patole, and Ranjit Pardeshi. The valedictory session was chaired by Sharad Patil. There were about 200 participants, including students and activists from all over Maharashtra. Some of these took part in conducting a pilot survey on the subject of Caste and Patriachy in rural Maharashtra.

January 16th to February 6th 2008 : Overlapping with the above Conference, the Centre also conducted a three-week Refresher Course in Women's Studies in collaboration with the Academic Staff College of this University. Twenty-seven college lecturers from Maharashtra in the subject of Sociology. History and Economics took part in the Course. The Course was inaugurated by Dr. Gabriele Dietrich. Lectures by eminent speakers, both academic and professional, specializing in various aspects of Women's Studies were arranged. The eminent feminist researcher and writer, Dr. Gail Omvet, delivered the valedictory address.

February 29th 2008 : A Legal Aid Workshop was organized for postgraduate women students of this university in collaboration with the Manikrao Pahade Law College, Aurangabad. The objective was to raise awareness among these students about various laws relating to women and about women's rights. The workshop was inaugurated by Justice Shashikant Sawale.

March 8th 2008 (International Women's Day) : The Centre was one of the organizers of a March 8th rally which took the issue of female foeticide as its main theme.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्राच्या वतीने दि. १२ आणि १३ मार्च २००८ रोजी द्वि-दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. चर्चासत्राचा विषय ***भारतीय स्वातंत्र्याची चळवळ : महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व बॅ. मोहम्मद अली जिना*** हा होता.

या चर्चासत्रासाठी माजी न्यायमूर्ती व गांधीवादी विचारवंत न्या. चंद्रशेखर अधिकारी, मा. गंगाप्रसादजी अग्रवाल, मा. शेषरावजी चव्हाण, मा. एस. एन. वुसी व मा. वीरेन्द्र कुमार बरनवाल यांनी आपले मौलिक विचार मांडले.

चर्चासत्रासाठी महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेरुन सामाजिक शास्त्रे विषयातील प्राध्यापक, विचारवंत व विद्यार्थी यांनी सहभाग नोंदविला होता. उदघाटन समारंभ मा. डॉ. ए.जी. खान, संचालक वीसीयुडी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र

संचालक :- डॉ. अफजल जी. खान

विद्यापीठाने संचालक या पदावर डॉ. ए.जी. खान यांची दिनांक ३१/०७/२००३ रोजी नियुक्ती केली. सन २००७-२००८ या वर्षासाठी कोचिंगसेंटर मध्ये दैनिक वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देऊन विद्यार्थ्याकडून प्रवेशासंबंधी अर्ज मागवून घेतले. निवड समितीची दिनांक ३१-१०-२००७ रोजी बैठक होऊन यावर्षी केंद्रामध्ये दि. १३/११/२००७ पासून नियमित वर्ग सुरु झाले. सध्या हे केंद्र अनुसूचित जाती (एस.सी.) इतर मागासवर्गीय (ओ.बी.सी.) या जाती / जमातीकरिता आहे. आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, अमरावती यांच्या दि. २००८-२००४ च्या पत्रान्वये या केंद्रामध्ये अनुसूचित जमाती एस.टी. विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यासंबधी प्रस्ताव २००८-०९ करिता मा. संचालक, समाज कल्याण विभाग, महाराष्ट्र शासन, पुणे यांच्याकडे दि. १७-०१-२००४ रोजी पाठविण्यात आलेला आहे, अद्याप त्यांच्याकडून मान्यता आलेली नाही. मान्यता आल्यावर कार्यवाही करण्यात येईल.

विभागातील उल्लेखनीय कार्यक्रम-

विद्यापीठातील प्री. आय.ए.एस. कोचिंग सेंटरचे विद्यार्थी डॉ. मिलिंद हिरवे व श्री. संतोष परगे यांची भारतीय प्रशासकीय सेवेमध्ये निवड झाल्याबद्दल व त्यांच्या यशाप्रीत्यर्थ विद्यापीठातर्फे सोमवार दि. २ जून २००८ रोजी सायंकाळी ४.०० वा. विद्यापीठाच्या महात्मा ज्योतिबा फुले सभागृहामध्ये सत्कार आयोजित करण्यात आला होता. मा. कुलगुरु डॉ. नागनाथ कोत्तापल्ले हे कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. डॉ. ए.जी. खान संचालक यांनी प्रास्ताविक केले. कुलसचिव डॉ. दीपक मुळे, डॉ. धायगुडे इत्यादी मान्यवर कार्यक्रमास आवर्जून उपस्थित होते.

नेट / सेट मार्गदर्शन आणि प्रशिक्षण केंद्र

संचालक :- डॉ. अफजल जी. खान

विद्यापीठाने संचालक या पदावर डॉ. ए.जी. खान यांची दिनांक ३१/०७/२००३ रोजी नियुक्ती केली. सन २००७-२००८ मध्ये २९ जून २००८ रोजी होणाऱ्या नेट परीक्षेसाठी मार्गदर्शन आणि प्रशिक्षण केंद्राने दैनिक वर्तमानपत्रांमध्ये जाहिरात देऊन विद्यार्थ्यांकडून प्रवेशासंबंधी अर्ज मागवून घेतले. सर्व विषयांचे एकूण जवळजवळ १५० अर्ज प्राप्त झाले व सर्व विद्यार्थ्यांना नियमित वर्गामध्ये मार्गदर्शन आणि प्रशिक्षण देण्यात आले.

दोन वर्षासाठी विद्यापीठ अनुदान मंडळ, न्यू दिल्ली यांनी नेट / सेट परीक्षेसाठी एस.सी./ एस.टी. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व प्रशिक्षण वर्गासाठी रु. ४.०० लाख अनुदान दिले त्यानुसार दैनिक वर्तमानपत्रांमध्ये जाहिराती देऊन प्रशिक्षणासाठी अर्ज मागविण्यात आले. एकूण जवळजवळ १२५ अर्ज प्राप्त झाले. तसेच विद्यापीठ अनुदान मंडळ, नवी दिल्ली यांनी नेट / अल्पसंख्याक विद्यार्थ्यासाठी प्रशिक्षणासाठी रु. ४.०० लाख अनुदान दिलेले आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांना मार्गदर्शन आणि प्रशिक्षण देण्यात आहे.

शैक्षणिक विभाग

मराठी विभाग

अध्यापकांची संख्या:- ०८

विभागातील उल्लेखनीय उपक्रम:-

१) दिनांक ०९-०८-२००७ ते ३०-०८-२००७ दरम्यान मराठी साहित्य : संशोधन आणि अध्यापन या विषयावर मराठीतील १७ व्या उजळणी वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. सदरील उजळणी वर्गाचे समन्वयक डॉ. प्रल्हाद जी. लुलेकर, प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख हे होते.

